**सं. फौ. खं. क्र. १०४६/२०२२**
**सरकार वि. शेख युसुफ**
**निशाणी १३**

सरकारतर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – अश्वीन दादाराव नाकाडे
वय – ३१ वर्ष धंदा – नौकरी
पत्ता – बोरी शिंगोरी, ता. पारशिवनी, जि. नागपूर.

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती एस.व्ही. रामटेके यांच्या तर्फे**

१. दिनांक १२/०६/२०२२ रोजी सकाळी १०.३० ते ११.०० च्या सुमारास मी पारशिवनी येथे माझ्या मोठया आईकडे दुचाकी क्र.एमएच–४०–बीआर–८७८१ ने जात होतो. माझ्या सोबत माझी पत्नी पल्लवी सुध्दा होती. आम्ही खंडाळा घाट रोड वर पोहोचलो व डिव्हायडर पासून वळत असतांना अचानक एक पारशिवनी कडे जाणारा ट्रक आला व त्याने आम्हाला धडक दिली व त्यामुळे आम्ही खाली पडलो. त्या ट्रकचा क्रमांक एमएच–४०–एन–४२५३ असा होता. ट्रकचा चालक व क्लीनर घटनेनंतर तेथून पळून गेले. घटनेनंतर मी बेशुध्द झालो होतो. त्यानंतर काय झाले हे मला माहिती नाही. तेथील लोकांनी मला आशा नर्सिंग हॉस्पीटल, कामठी येथे भरती केले होते. मला शुध्द आली तेव्हा मी दखावान्यात असल्याचे मला समजले. पोलीस तेथे आले व माझे बयान नोंदविले. घटनेबाबत माझ्या हाताला दुखापत झाल्यामुळे त्यांनी बयानावर माझा अंगठा घेतला. आता मला फिर्याद दाखविली. त्यावर माझा अंगठा आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१४** देण्यात येते. आता मला छापिल फिर्याद दाखविली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१५** देण्यात येते. पोलीसांनी माझे बयान घेतले नव्हते. घटनेच्या वेळी मी ट्रक चालकाला बघितले नव्हते.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील रिना गणवीर यांच्यातर्फे.**

२. हे म्हणणे खरे आहे की पारशिवनीला जात असतांना मी चुकीच्या बाजूने वळन घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की अपघाताच्या वेळी कुठुन येत होता हे माझ्या लक्षात आले होते. हे म्हणणे खरे नाही की सदर अपघात माझ्या निष्काळजीपणाने झाला. हे म्हणणे खरे आहे की अपघाता झाल्यानंतर मी बेशुध्द पडलो होतो त्यामुळे कुठल्या ट्रकने माझा अपघात झाला होता हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की सरतपासात सांगितल्याप्रमाणे घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

सही/–
**(रा.र. शेरेकर)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्या. क्र. ३, कामठी.

ठिकाण –कामठी
दिनांक –२५/०१/२०२४